बृहन्महाराष्ट्र वृत्त

बृहन्महाराष्ट्र मंडळाचे मुखपत्र

BMA बृहन्महाराष्ट्र मंडळ

॥ मराठी तितुका मेळवावा ॥

On the web
www.bmmonline.org

समस्त मराठीप्रेमींसाठी उत्तर अमेरिकेतील एकमेव मराठी मासिक

जुलै २०१९
वर्ष ३९, अंक ७



अध्यक्षीय

नमस्कार मित्रहो,

आपण सर्व ज्या आतुरतेने आपल्या १९व्या अधिवेशनाची वाट पहात आहोत ती घटिका काही दिवसांवर येऊन ठेपली आहे आणि त्याच बरोबर आमच्या कार्यकारिणीचा निर्वाचित कालखंडदेखील शेवटच्या वळणावर येऊन पोहोचला असून आता नवीन विचारांच्या समितीकडे ही ध्वजा सुपूर्द करण्याची वेळ आली आहे. २०१७ सालच्या ऑगस्ट महिन्यात आमच्या समितीने सूत्रे हाती घेतल्यानंतर, अनेकविध आठवणींनी समृध्द केलेली ही दोन वर्षे माझ्या दृष्टीने एक आनंदयात्राच म्हणावी लागेल. आणि हे भाग्य मला मिळवून दिल्याचं संपूर्ण श्रेय हे आमच्या कार्यकारिणीच्या सर्व स्वयंसेवकांचं आहे. ह्या दोन वर्षांच्या कालावधीत संस्थेच्या अनेक माजी अध्यक्षांनी तसेच हितचिंतकांनी वेळोवेळी दिलेल्या निरपेक्ष सहकार्याने अनेक गोष्टी सुकर झाल्या, त्याबद्दल त्या सर्वांचे मन:पूर्वक आभार!

गेल्या दोन वर्षात, बृहन्महाराष्ट्र मंडळाचा अध्यक्ष ह्या नात्याने आपणां सोबत विविध माध्यमातून संवाद साधायची संधी मला मिळाली. कधी प्रत्यक्ष भेटीतून, कधी ईमेलद्वारे तर कधी फेसबुकच्या माध्यमातून! मात्र अत्यंत चोखंदळ वाचकवर्ग लाभलेल्या आपल्या मासिक 'वृत्त'मधील अध्यक्षीय सदरातून आपणांसोबत संवाद साधणं हे माझ्यासाठी निश्चितच एक आव्हान होतं आणि आव्हान वाटावं ह्याचं प्रामुख्याने कारण हेच, की आपल्या वृत्ताचा टिकवून ठेवलेला साहित्यिक दर्जा! आपल्या वृत्ताची साहित्यिक मूल्यांच्या जपणूक करण्याच्या कार्यात आपल्या साहित्यातून मोकळेपणी व्यक्त होऊन अनेकांनी जो हातभार लावला आहे त्यांचे कौतुक करावे तेवढे थोडे आहे; खरं तर अनेकांची नावे येथे नमूद करायचा मोह मला होतोय पण तो प्रयत्नपूर्वक टाळतो; पण तरीही संपादिका विनता कुलकर्णींचा उल्लेख न करणं हे केवळ अशक्य आहे. इतकी वर्षे न चुकता दर महिन्याच्या १ तारखेला वृत्त प्रकाशित होण्यामागे त्यांचे खूप मोठं योगदान असतं आणि त्याबद्दल त्यांचे कौतुक करावे तेवढे थोडे आहे.

२०१९-२१च्या कालखंडासाठी, बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या अध्यक्षपदासाठी विद्या जोशींची निवड बिनविरोध झाल्याबद्दल त्यांचे मन:पूर्वक अभिनंदन. नवीन विचारांची नवी कार्यकारिणी बृहन्महाराष्ट्र मंडळाचे कार्य त्याच निष्ठेने पुढे नेतील ह्याची खात्री तर आहेच पण आजवर आपण सर्वांनी जे सहकार्य, प्रेम आम्हाला दिलंत, तसंच ह्यापुढेही द्याल ह्यात कोणतीही शंका नाही, तेव्हा लवकरच भेटूया आपल्या अधिवेशनात!

कळावे, लोभ असावा ही विनंती!

- अविनाश पाध्ये, अध्यक्ष (२०१७-२०१९)
बृहन्महाराष्ट्र मंडळ, उत्तर अमेरिका

या अंकात...

अधिवेशनाविषयी आपल्या प्रतिक्रिया:

बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या २०१९च्या डॅलस येथील अधिवेशनाविषयी आपल्या प्रतिक्रिया, अनुभव खालील ईमेल वा पोस्टल'पत्त्यावर जरूर पाठवावेत. **ऑगस्टच्या** अंकासाठी लिखाण पाठविण्याची अंतिम तारीख **२० जुलै, २०१९. शब्दमर्यादा ६००.**

अंकासाठी साहित्य/मजकूर पाठविण्याचा पत्ता:

vinata@gmail.com or newsletter@bmmonline.org
3251 Thunderbird Court (E) Aurora IL, 60503

पुरवणी- ई-विभाग (बृ. म. मंडळाच्या संकेतस्थळावर)

राशिभविष्य: जुलै २०१९ - दादा दामले (न्यू जर्सी)
संकेतस्थळ: http://bmmonline.org/vrutta-esahitya

बृहन्महाराष्ट्र वृत्त

बृहन्महाराष्ट्र मंडळ उत्तर अमेरिका या संस्थेचे मुखपत्र

स्थापना 1981 (शिकागो)

संस्थापक: कै. विष्णु वैद्य, कै. शरद गोडबोले, जयश्री हुपरीकर

संपादक: विनता कुलकर्णी, शिकागो, इलिनॉय

संपादन-सल्लागार: मोहन रानडे, फिलाडेल्फिया, पेन्सिल्वेनिया

बृहन्महाराष्ट्र वृत्त कार्यालय

Mohan Ranade 144 Hope Road, Holland PA 18966
Tel: 1-215-354-1423 (EST), E-mail: brihanmm@gmail.com

वर्गणीचे दर: Printed Copy: $25/ year

Subscription payment is accepted online by Paypal at:
http://www.bmmonline.org/vruttasubscription

जाहिरातींसाठी

संपर्क: newsletter@bmmonline.org
brihanmm@gmail.com

वृत्त दर महिन्यास प्रसिध्द होते. आदल्या महिन्याच्या 20 तारखेपर्यंत हाती आलेल्या मजकुरातून निवडक मजकूर त्या नजिकच्या वृत्तपत्रात प्रसिध्द करण्याचे सर्व प्रयत्न केले जातील. मजकूर शक्यतो युनिकोड मराठीत MS word/Text Fileसह ईमेलने पाठवावा. प्रसिध्द झालेल्या मजकुराशी संपादक मंडळ सहमत असतेच असे नाही. लिखाणाच्या निवडीचे, प्रकाशनयोग्य किरकोळ बदलाचे आणि व्याकरणीय दुरुस्तीचे अंतिम अधिकार संपादक मंडळाकडे राहतील. पाठवलेल्या साहित्याची पोच ईमेल कळविल्यास दिली जाईल.

प्रकाशक: बृहन्महाराष्ट्र मंडळ, उत्तर अमेरिका

संकेतस्थळ: http://www.bmmonline.org

बृहन्महाराष्ट्र मंडळ अधिवेशन २०१९- वृत्तांत

- मंजू रुईकर, मंजिरी जोशी (डॅलस, टेक्सस)

वऱ्हाड निघालंय डॅलसला!
सखुबाई, साळूबाई, चला,
चला, चला, लग्नाला चला!'
लग्नाला नाही, अधिवेशनाला चला!

खरोखर, अगदी लगीनघाईप्रमाणे आम्हा सर्वांच्या अंगात उत्साह संचारलाय आणि आपल्या कार्यावर शेवटचा हात फिरवण्यात सगळे व्यस्त आहेत. गेले कित्येक महिने आम्ही अधिवेशनाचं वृत्त तुम्हाला देत आहोत, आमच्या कामाचा आढावा घेत आहोत. आता या कामाची सांगता व्हायची मंगल घटिका जवळ आली आहे. बहुतेक समित्यांची तयारी पूर्ण झाली आहे. प्रत्यक्ष अधिवेशन काळातील कामाचा मिनिटागणिक आराखडा तयार आहे... डे झीरो (११जुलै)पासून डे थ्री (१४जुलै)पर्यंत!

आपल्याला सर्वांत मोठी उत्सुकता असते ती भारतातून येणाऱ्या कार्यक्रमांची! भारतातून येणाऱ्या बहुतेक कलाकारांच्या व्हिसाला हिरवा कंदिल मिळाला आहे. अधिवेशनाला नोंदणी केलेल्या थोड्याथोडक्या नव्हे तर ३८०० लोकांसाठी ही एक आनंदाची बातमी आहे. लवकरच हा आकडा ४०००च्या वर पोहोचेल याची आयोजकांना खात्री आहे. **विविध प्रांतांतून झालेली नोंदणीसंख्या खालील संकेतस्थळावर पहावी.**
https://www.bmmonline.org/sites/default/files/BMM/BMM/StatewiseRegistartion2019.pdf

अधिवेशनाला प्रथमच येणाऱ्या पाहुण्यांसाठी नावनोंदणी (रजिस्ट्रेशन) समितीने काही सूचना दिल्या आहेत. एवढ्या मोठ्या संख्येने सर्वांचे रजिस्ट्रेशन सुरळीतपणे होण्यासाठी आणि डे वनची गर्दी कमी करण्यासाठी डे झीरो सकाळ/संध्याकाळ आणि त्याच्या आदल्या संध्याकाळी म्हणजे दहा जुलैलासुध्दा रजिस्ट्रेशन होऊ शकेल. तुम्ही डे वनपासून येणार असाल तर सकाळी सात वाजता रजिस्ट्रेशन डेस्क सुरू होईल. देणगीदार आणि व्हीलचेअरवरील पाहुण्यांसाठी वेगळे डेस्क असेल. तुमची नोंदणी झाल्याची ई-मेल व तुमचे फोटोसहित ओळखपत्र तयार ठेवा म्हणजे आमच्या कामाला वेग येईल. तुमच्या रजिस्टर्ड गटातील प्रत्येक सदस्याला अधिवेशनाचे ओळखपत्र मिळेल; त्यावर त्याचे नाव, गाव, प्रांत, नोंदणी केलेले डे झीरोचे कार्यक्रम, मुख्य दालनातील आसन क्रमांक इत्यादी माहिती असेल. संपूर्ण अधिवेशनात हे ओळखपत्र धारण करणे आवश्यक आहे. प्रत्येक रजिस्टर्ड गटाला स्मरणिका आणि इतर माहितीपत्रके असलेली बॅग इथेच मिळेल.

डे झीरोला उत्तररंग, CME आणि BizCon हे पूर्ण दिवसाचे कार्यक्रम आहेत, त्यांच्यासाठी वेगळी नोंदणी आवश्यक आहे. Biz-Con अंतर्गत My investments हे अतिशय उपयुक्त माहितीसत्र आयोजित केले आहे. या कार्यक्रमात भारतातून आणि अमेरिकेतून

आलेल्या १७ अर्थतज्ज्ञांचे मार्गदर्शन लाभेल. BizConचे तिकीट ५ जुलैपर्यंत घेतल्यास एका तिकिटावर एक तिकिट मोफत मिळण्याची तरतूद आहे. याविषयी काही प्रश्न असल्यास BizConTeam@bmm2019.org या ईमेलवर विचारू शकता.

BizConचे वेळापत्रक आणि CMEची कार्यक्रमपत्रिका पाहण्यासाठी संकेतस्थळ: (Click, and scroll down the webpages below.)
https://www.bmm2019.org/myinvestment/
https://www.bmm2019.org/continuing-medical-education/

डे झीरो ते डे तीन सर्व कार्यक्रमांचे वेळापत्रक या अंकात पान ४, ५ वर आहे. विशेष म्हणजे अँड्राईड आणि आयफोनच्या सहाय्याने ॲपल व गुगल स्टोरमधून BMM2019 हे ॲप डाउनलोड करून प्रत्येकाला आपले स्वतंत्र कार्यक्रमांचे वेळापत्रक आखता येईल. यासाठी ॲपचे मे महिन्यानंतरचे व्हर्जन घेणे आवश्यक आहे. सुरुवातीच्या काही स्वाईप्सनंतर तुम्हाला ईमेल विचारण्यात येईल. आपण नोंदणी करताना वापरलेला ईमेल ॲड्रेसच यावेळेस वापरणं आवश्यक आहे. या ॲपमुळे हॉटेल, पार्किंग, कार्यक्रमांचे ठिकाण, त्याचे वेळापत्रक, प्रतिष्ठित मंडळींची आणि स्थानिक स्थळांची माहिती सगळ्यांना सहजगत्या उपलब्ध होऊ शकेल. कार्यक्रम सुरू असताना तिथेच फीडबॅकही देता येईल. चेक-इनची सोय व अजूनही अनेक वैशिष्ट्ये या ॲपमध्ये आहेत.

हॉटेल 'हयात' ते DCC यामधील बसेसचं वेळापत्रक आता निश्चित झालं आहे. **वेळापत्रक पाहण्यासाठी संकेतस्थळ: -**
https://www.bmmonline.org/sites/default/files/BMM/BMM/ShuttlescheduleBMM2019.pdf

ज्येष्ठ मंडळींसाठी व्हीलचेअरची सोय करण्यात आली आहे. Childcare साठी तीनही दिवशी सकाळी ८:००पासून मुलांना check-in करता येईल. डे वन व डे टू'ला check-outची वेळ रात्री १०:३० पर्यंत केव्हाही आणि शेवटच्या दिवशी दुपारी १:०० पर्यंत आहे.

आमची आतिथ्य समिती टेक्ससला साजेसा दाक्षिणात्य पध्दतीचा पाहुणचार करण्याच्या तयारीला लागली आहे. स्वागताबरोबरच आपल्याला येणाऱ्या सर्व अडीअडचणींवर मात करण्यासाठी त्या समितीचे सदस्य ठिकठिकाणी असतील. 'मे आय हेल्प यू' बूथही इथे असतील. सर्वांच्या अपेक्षेपेक्षा काकणभर जास्तच सुखसोयी देण्यावर समितीचा भर आहे.

'गुंजन' ही स्मरणिका सजूनधजून छपाईसाठी तयार आहे. अधिवेशनाच्या इतिहासात पहिल्यांदाच Ebook व AudioBook या स्वरूपातही स्मरणिका मिळणार आहे. ज्यांना मराठी वाचता येत नाही पण ऐकलेलं मराठी कळतं अशा लोकांचा विचार करून ही योजना आकारात येत आहे.

डे वन आषाढी एकादशी आहे. आवर्जून सांगावेसे वाटते. एकादशी म्हटली की आठवते ती दिंडी! आपल्या अधिवेशनातही ती 'गौरवयात्रा' या आधुनिक स्वरूपात DFW महाराष्ट्र मंडळ सादर करणार आहे. त्याची माहिती या लेखानंतर आहेच. तर मंडळी, सांगावं तेवढं थोडंच आहे. आता तुमच्या 'भेटीलागी जीवा आस' लागली आहे. तेव्हा,

'या रे, सारे जमूया, गुढी उभारुया मायमराठीची!'

***

गौरवयात्रा

" या भूमंडळाचे ठायी । धर्मरक्षी ऐसा नाही ।
महाराष्ट्रधर्म राहिला काही । तुम्हां कारणे ॥" - रामदास स्वामी

महाराष्ट्र धर्म टिकवण्यासाठी, जोपासण्यासाठी आणि तो वाढवण्यासाठी ज्या अनेक थोर व्यक्तींनी अपार परिश्रम घेतले, अशा गौरवास्पद व्यक्तींच्या स्मरणार्थ आणि त्यांना मानवंदना देण्यासाठी डॅलस येथे होणाऱ्या १९व्या बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या अधिवेशनात, जुलै १३, २०१९ रोजी एक भव्य स्वरूपाची गौरवयात्रा डॅलस फोर्टवर्थ महाराष्ट्र मंडळाने आयोजिली आहे. ही गौरवयात्रा ३ विभागांमध्ये आखली गेली आहे. महाराष्ट्र धर्म संस्थापक छत्रपती शिवाजी महाराजांपासून ते समाजाला योग्य दिशा दाखवणारे संत, थोर साहित्यिक, अशा काही व्यक्तिमत्त्वांना या यात्रेच्या माध्यमातून गौरवण्यात येईल.

ह्या गौरवयात्रेत अमेरिकेतील ढोल ताशा पथके जवळ जवळ ५० ढोल, १० ताशे, १०० लेझीम यांसह भाग घेत आहेत. आपणां सर्वांनी ह्या गौरवयात्रेत सहभागी होऊन त्याची शोभा वाढवावी.

अधिक माहिती: https://www.bmm2019.org/gauravyatra/

Matrimonial

US Citizen Maharashtrian Brahmin woman age 24 looking for a suitable match from men 25 to 30 years of age. She is very attractive, 5' 5" in height with Bachelors and Masters degrees from an Ivy League college and attending Medical School shortly. Men should be Brahmin US Citizens or Green Card holders, well educated and accomplished with height 5' 9" or above. Send inquiries to brihanmm@gmail.com

बृहन्महाराष्ट्र मंडळ अधिवेशन २०१९- (डॅलस, टेक्सस) - कार्यक्रमांचे वेळापत्रक

DAY 0 — Thursday July 11th, 2019

Bruhan Maharashtra Mandal 19th Convention
Dallas, Texas, U.S.A.| 11th to 14th July, 2019

Time	Ballroom A1-to-A4 Combined	Ballroom A1	Ballroom A4	C large C1+C2	Exhibit HALL B: Dining
7:00-9:00am					Breakfast
9:00-9:30am		My Investments 2019	Continuing Medical Education	Uttar Rang	
9:30-10:00am					
10:00-10:30am					
10:30-11:00am					
11:00-11:30am					
11:30-12:00pm					
12:00-1:30am					Lunch
1:30-2:00pm					
2:00-2:30pm					
2:30-3:00pm					
3:00-3:30pm					
3:30-4:00pm					
4:00-4:30pm					
4:30-5:00pm					
5:00-5:30pm					
5:30-6:00pm					
6:00-6:30pm	Cocktail Hour (For Banquet Attendees Only)				
6:30-7:00pm					
7:00-7:30pm	Banquet Dinner (For Banquet Attendees Only)				
7:30-8:00pm					
8:00-8:30pm	Announcemenes				
8:30-9:00pm	Banuet Program Immortal Bollywood by Hrishikesh Ranade and Aarya Ambekar (For Banquet Attendees Only)				
9:00-9:30pm					
9:30-10:00pm					
10:00-10:30pm					
10:30-11:00pm					

DAY 1 — Friday July 12th, 2019

Bruhan Maharashtra Mandal 19th Convention
Dallas, Texas, U.S.A.| 11th to 14th July, 2019

Time	Arena	Theater	Ballroom A2+A3 combined	C large C3+C4	C large C1+C2	Ballroom A1	Ballroom A4	Meeting Rm (A309+310)	Exhibit hall A: Expo	Exhibit HALL B: Dining
7:00-7:30am										Breakfast
7:30-8:00am										
8:00-8:30am										Breakfast (ltd)
8:30-9:00am	BMM2019 Inauguration									
9:00-9:30am										
9:30-10:00am										
10:00-10:30am	Opening ceremony by Dallas FortWorth Maharashtra Mandal									
10:30-11:00am										
11:00-11:30am										
11:30-12:00pm									Aarati @Mandir	Expo
12:00-12:30pm										Lunch
12:30-1:00pm		Sand Art								
1:00-1:30pm	Dhol Tasha Competition Finale	Jara Jara Tipur Chandane by Hrishikesh Ranade and Aarya Ambekar	Mana Kara Re Prasanna by Sanjay Upadhye	Shabdanchya Gava Jave by Deepali Kelkar	Chintoo Tumchya Bhetila by Charuhas Pandit			YAY Meet & Greet		
1:30-2:00pm										
2:00-2:30pm										
2:30-3:00pm			Varhad Nighalay London La		Live stress free by Vasant Chapnekar	NGO summit	YAY Panel discussion		Chintoo workshop	Expo/Tea Time
3:00-3:30pm										
3:30-4:00pm	Allkhit Pananchi Kahani from Austin									
4:00-4:30pm										
4:30-5:00pm		Premachya Gava Jave from Kansas City		Kavitanjali by Aruna Dhere	Waari Pandharichi by MMBA		Vadhu-Var Snehbhet	YAY Mehendi		
5:00-5:30pm			Sa Re Ga Ma Competition Finale							
5:30-6:00pm										
6:00-6:30pm										
6:30-7:00pm										Dinner
7:00-7:30pm										
7:30-8:00pm										
8:00-8:30pm	Dear Aajo									
8:30-9:00pm	BMM Pustak prakashan in Interval									
9:00-9:30pm										
9:30-10:00pm										
10:00-10:30pm										
10:30-11:00pm										

बृहन्महाराष्ट्र मंडळ अधिवेशन २०१९- (डॅलस, टेक्सस) - कार्यक्रमांचे वेळापत्रक

DAY 2 — Saturday July 13th, 2019

Bruhan Maharashtra Mandal 19th Convention
Dallas, Texas, U.S.A.| 11th to 14th July, 2019

Time	Arena	Theater	Ballroom A2+A3 combined	C large C3+C4	C large C1+C2	Ballroom A1	Ballroom A4	Meeting Rm (A309+310)	Outdoors	Exhibit HALL B: Dining
7:00-7:30am										Breakfast
7:30-8:00am									Gaurav Yatra (Procession with Dhol Tasha & Lezim)	
8:00-8:30am										
8:30-9:00am										
9:00-9:30am	Keynote Speaker									Breakfast (ltd)
9:30-10:00am										Expo
10:00-10:30am								YAY - Dance Workshop		
10:30-11:00am	Staging Frames	Batatychi chaal by Theatrix New Jersey	Anaadi mi Awadhya mi by Lalita Gauri Agashe Seattle	Keertan Ek Divya Parampara By Makarand buva Ramdas	Shabdewin samwadu by Nadabrahm, Austin		BMM Shala Meeting			
11:00-11:30am										
11:30-12:00pm										
12:00-12:30pm										Lunch
12:30-1:00pm										
1:00-1:30pm	Srujan Trayi by Houston Maharashtra Mandal		Effortless Weight loss & Diabetes prevention by JV Dixit	Ubhya Ubhya Vinod	YAY-Nothing But Treble	Balgandharv te Bakul Pandit by Ashwini Gore	Mysteries of Chakra by Manju Joshi			
1:30-2:00pm										
2:00-2:30pm										
2:30-3:00pm										
3:00-3:30pm	Rubaru	Swar Nakshtra by Vijay Koparkar, Devaki Pandit								
3:30-4:00pm										
4:00-4:30pm										
4:30-5:00pm										YAY Happy hour Expo/Tea Time
5:00-5:30pm										
5:30-6:00pm		Amha Ghari Dhan from Atlanta	Just Asach	Wah Ustad Classical Singing Competition Finale	Meghadoot by Dhanashree Lele	YAY-Michael Good comedian	BMM MEETING			
6:00-6:30pm										
6:30-7:00pm										Dinner
7:00-7:30pm										
7:30-8:00pm										
8:00-8:30pm										
8:30-9:00pm	Saptasur Maaze by Ashok Patki									
9:00-9:30pm										
9:30-10:00pm										
10:00-10:30pm										
10:30-11:00pm										

DAY 3 — Sunday July 14th, 2019

Bruhan Maharashtra Mandal 19th Convention
Dallas, Texas, U.S.A.| 11th to 14th July, 2019

Time	Arena	Ballroom A1	Ballroom A4	Exhibit HALL B: Dining
6:00-6:30am				
6:30-7:00am				
7:00-7:30am				
7:30-8:30am				Breakfast
8:30-8:45am	Closing ceremony			
8:45-9:00am	BMM Shala			
9:00-9:15am	BMM Schlorships			
9:15-9:30am	BMM Awards			Breakfast (Ltd.)
9:30-10:00am	Baton Transfer			
10:00-10:30am	Bhetit Guptata Mothi Star-studded from India			
10:30-11:00am				
11:00-11:30am				
11:30-12:00pm				Boxed Lunch
12:00-12:30pm	राम राम y'all			

शब्दकोषावर विजय मिळवणारा सोहम सुखटणकर

- शब्दांकन प्रज्ञा आपटे (शार्लट, नॉर्थ कॅरोलायना)

स्क्रिप्स नॅशनल स्पेलिंग बी ही सर्वसाधारणपणे नॅशनल स्पेलिंग बी या नावाने अमेरिकेत ओळखली जाते. राष्ट्रीय स्तरावर तर ही स्पर्धा अटीतटीची आहेच पण राष्ट्रीय स्तरावर यात भाग घेता येण्यासाठी जी निवड प्रक्रिया आहे तीच मुळात खूप स्पर्धात्मक आहे. यावर्षी स्क्रिप्स नॅशनल स्पेलिंग बी (अमेरिका) ही स्पर्धा ३० मे २०१९ रोजी होती. १ कोटीपेक्षा जास्त (११ मिलिअन) मुलांमधून यावर्षी ५६२ मुलं स्क्रिप्स नॅशनल स्पेलिंग बी अंतिम फेरीसाठी पात्र ठरली. दरवर्षी फक्त एक विजेता घोषित केला जातो. पूर्वी एकदा अपवाद म्हणून तीन स्पर्धक एकत्र विजेते (co-champions) म्हणून घोषित केले होते. पण या वर्षी या स्पर्धेचा निर्णय न भूतो न भविष्यति असा लागला! शब्दकोषावर (dictionary) पूर्ण विजय मिळवणाऱ्या आठ स्पर्धकांची नावं एकत्रितरित्या विजेता (Octochamps) म्हणून घोषित केली गेली. हे आठही स्पर्धक कमालीच्या तयारीचे आहेत असं यांचं वर्णन केलं गेलं.

जॅक बेली, या स्पर्धेमध्ये मुलांना अचूक उच्चार करून, शब्द सांगतात. मग त्या शब्दाचं स्पेलिंग स्पर्धक सांगतात. बेली यांनी जाहीर केलं, की आमच्याकडच्या शब्दकोषातले शब्द संपले नाहीत पण या मुलांना सर्वच शब्द चपखल येत आहेत.

सोहम सुखटणकर हे त्या आठ विजेत्यांपैकी एक मराठी नाव. चला तर मग, सोहमचे पालक **मंदार** आणि **गार्गी सुखटणकर** यांना प्रश्न विचारून हे सगळं कसं घडलं ते जाणून घेऊया.

प्रश्न: डॅलस विभागातून सोहम या स्पर्धेसाठी गेला. डॅलस विभाग (region) हा नॅशनल स्पेलिंग बी चा बालेकिल्ला आहे हे खरं आहे कां ?

उत्तर: नॅशनल स्पेलिंग बी साठी मुळात आधी तुमचा वर्ग मग शाळा, त्यानंतर काऊंटी आणि मग तुमचा विभाग असे चार टप्पे पार करून मग राष्ट्रीय स्तरावर जाता येतं. राष्ट्रीय स्तरावर जे स्पर्धक जातात त्यात मोठ्या प्रमाणावर डॅलस विभागामधले स्पर्धक असतात. गेल्यावर्षी अंतिम फेरीत आलेल्या स्पर्धाकांपैकी तीन स्पर्धक डॅलस विभागामधूनच होते. त्यामुळे मुळात या विभागामधून निवड होतानाच खूप स्पर्धा असते.

प्रश्न: यासाठी सोहमला किती तयारी करावी लागली? त्यात तुमचा दोघांचा पालक म्हणून काय सहभाग होता?

उत्तर: आठवड्यामध्ये रोज तीन-चार तास आणि शनिवार - रविवार सात ते आठ तास अभ्यास असा साधारणपणे यासाठी वेळ द्यावा लागतो. ही तयारी करताना केवळ शब्दाचं स्पेलिंग पाठ करणं हा उद्देश नाही. तर माहिती नसलेले अनेक शब्द जेव्हा आपल्यासमोर येतात तेव्हा त्या शब्दाचा उगम कोणत्या भाषेतून झाला, त्या शब्दाचं मूळ काय यासारख्या गोष्टी लक्षात ठेवाव्या लागतात. त्यानेच तुमची शब्दसंपत्ती वाढते.

काही वेळा सोहम स्पेलिंग बी चा अभ्यास मधेच थांबवायचा आणि शाळेने दिलेला अभ्यास पूर्ण करतो असं म्हणायचा. त्यावेळी आम्ही त्याला सांगितलं, की तू शाळेचा अभ्यास करतो आहेस हे चांगलंच आहे, पण तुला तुझ्याकडे असलेला वेळ नीट विभागून वापरला पाहिजे. कोणत्या एकाच गोष्टीवर जास्त वेळ दिल्यास दुसऱ्या गोष्टीला वेळ कमी पडेल.

काहीवेळा मी (मंदार सुखटणकर) त्याच्याशेजारी बसून माझं ऑफिसचं काम करत असे. तो उठला तर मी त्याला सांगत असे, की मी गेले अर्धा तास बसलो आहे आणि उठत नाहीये, तर तू पण आणखी वेळ बसून अभ्यास करायचा प्रयत्न कर. खूप वेळ बसून अभ्यास करायची सवय एकदम होणार नाही. हळूहळू वेळ वाढवावा लागेल आणि मी तुझ्याबरोबर तुला सवय होईपर्यंत आहे. मी शेजारी बसल्यामुळे माझं त्याच्या अभ्यासावर लक्ष रहायचं, तसंच त्याला जर कधी प्रोत्साहन द्यावं लागलं तर मी तिथेच असे.

आम्ही टी. व्ही. पाहताना कधी 'तू अभ्यास कर. आम्ही तोपर्यंत टी. व्ही. पाहतो' असं म्हटलं नाही. आम्ही एकत्रच टी. व्ही. पाहत असू. आणि एकत्रच टी. व्ही. समोरून उठत असू. आपण वेळ फुकट घालवला तर मुलांना असं सांगता येत नाही की तू वेळ फुकट घालवू नकोस किंवा तू तुझ्या वेळाचं नीट नियोजन कर. पालक म्हणून तुम्हाला स्वतःलाही तसं वागावं लागतं.

प्रश्न: निवड-प्रक्रियेतच इतकी अटीतटीची स्पर्धा असलेल्या या स्पर्धेत, राष्ट्रीय स्तरावर, सोहम निवडला गेला. याबद्दलचा त्याचा प्रवास कसा होता ?

उत्तर: सोहमने पहिल्यांदा या स्पर्धेत भाग घेतला तेव्हा तो चौथीत होता. तेव्हा त्याला यात लगेच यश मिळालं नाही. अर्थात त्याला स्पर्धेचा काही अनुभवही नव्हता. त्यामुळे 'तो हरला' असं आम्ही वाटून घेतलं नाही. यावेळी मला एक महत्वाचं वाक्य आठवलं - अपयशाचं विष पचवून जो यशाकडे झेप घेतो तो महापुरुष !

खरंतर हे नुसतं वाक्य नाहीये. हा सत्गुरू श्री. वामनराव पै यांचा अमृततुषार आहे. **सत्गुरू श्री. वामनराव पै यांनी जीवनविद्या या तत्वज्ञानाची निर्मिती केली. आणि आता जीवनविद्येचे तज्ञ श्री. प्रल्हाद वामनराव पै आम्हाला याबाबत मार्गदर्शन करतात.** मनःस्थिती सतत शुभ ठेवली पाहिजे असं श्री. प्रल्हाद वामनराव पै आम्हाला नेहमी सांगतात. कारण मनःस्थिती शुभ असली तर परिस्थिती बदलते. त्यामुळे सोहमला पहिल्या प्रयत्नात जरी पूर्ण यश मिळालं नाही तरी आम्ही त्याला सांगितलं, की तू आत्ता चौथीत आहेस. तुला आठवीमध्ये जाईपर्यंत या स्पर्धेत भाग घेता येईल. आपण पुन्हा प्रयत्न करू आणि जास्त प्रयत्न करू. पण त्याआधी आम्ही त्याला विचारलं, की

तुला हे आवडतंय ना? तुला पुढच्या वर्षी परत भाग घ्यायचा आहे ना? तो तयार होता म्हणून मग आम्ही त्याची पुन्हा तयारी करून घ्यायला लागलो. त्यासाठी आवश्यक असलेल्या गोष्टी त्याला पुरवल्या.

पुढच्या वर्षी त्याने आणखी पुढच्या पायऱ्या जिंकल्या. ते वर्ष होतं २०१७! आम्ही त्याला राष्ट्रीय स्तरावर (National level) स्पर्धेला नेलं पण तिथे आम्ही गेल्यावर लक्षात आलं की आम्ही केली आहे त्यापेक्षा जास्त तयारी करण्याची गरज आहे. पण तरीही सोहम त्या स्पर्धेत राष्ट्रीय स्तरावर पहिल्या चाळीसात आला. मग पुढच्या वर्षी, २०१८ मध्ये पण जेव्हा तो राष्ट्रीय स्तरावर स्पर्धेला गेला तेव्हा आम्ही आधीपेक्षा जास्त तयारी केली होती. तेव्हा तो पहिल्या तीस मुलांच्यात आला. पण स्पर्धा जिंकण्यासाठी आणखी अभ्यास आणि प्रयत्नाची गरज आहे हे तेव्हा आमच्या लक्षात आलं. त्याचवर्षी म्हणजे २०१८ मध्ये सोहम एक स्पेलिंग बी जिंकला. ती अमेरिकेतील दक्षिण आशियाई मुलांसाठी– साऊथ एशिअन स्पेलिंग बी स्पर्धा होती.

सोहमची एकंदर प्रगती बघता आमच्या लक्षात आलं की आम्ही पूर्ण शक्तीनिशी प्रयत्न केले तर सोहम जिंकणं शक्य आहे. पूर्ण शक्तीनिशी हे मी एवढ्याकरता म्हटलं की आम्ही जीवनविद्येत शिकवलेली मनाची शक्ती वाढवणारी तंत्र (Mind management techniques) वापरली. यात सतत शुभचिंतन, मनाने दुसऱ्याशी संवाद साधणे (internal communication) मनःचक्षूसमोर चित्र आणणे (visualization) या गोष्टींचा खूप उपयोग केला.

प्रश्न: या सगळ्या क्लुप्त्या (strategies) सोहमला स्पर्धा जिंकण्यासाठी कशा उपयोगी पडल्या ?

उत्तर: पहिली गोष्ट अशी, की आम्ही प्रयत्नात अजिबात कसूर केली नाही. उलट जास्त प्रमाणात पध्दतशीर प्रयत्न - अभ्यास या गोष्टी केल्या. पण या सगळ्या गोष्टींसाठी मानसिक ताकद लागते. आपलं लक्ष विचलित होऊ नये, आपलं ध्येय काय आहे याची सतत आठवण रहावी यासाठी एक मानसिक तयारी लागते. ती जशी मुलांना आवश्यक आहे तशीच ती त्यांच्या पालकांनाही असणं आवश्यक असते. कारण तुम्ही तुमच्या मुलांचा आधार असता. पालक म्हणून ही ताकद आम्हाला जीवनविद्येच्या अभ्यासातून मिळाली. ही मन:शक्ती वाढवणारी टेक्निक्स वापरण्यासाठी जीवनविद्येत काही exercises शिकवले जातात. त्याचा आम्हाला खूप उपयोग झाला.

प्रश्न: तुमच्या सांगण्यातून एक गोष्ट प्रकर्षाने जाणवली, की तुम्ही प्रयत्न करताना कुठेही कमतरता ठेवली नाहीत. पण त्या प्रयत्नांना जीवनविद्येची जोड दिलीत. तुम्ही जीवनविद्येची टेक्निक्स कशी वापरली याबद्दल सांगता येईल का?

उत्तर: मेहनत, अभ्यास, पध्दतशीर प्रयत्न हे सगळं आपलं कर्म आहे. हे सगळं करत असताना सगळं चांगलंच होणार (कर्मातच कर्माचं फळ) हा ठाम विश्वास जीवनविद्येच्या ज्ञानातून आला आहे. शिवाय आम्ही सोहमला जिंकण्यावर लक्ष केंद्रित करण्यापेक्षा त्याच्या प्रयत्नांवर लक्ष केंद्रित करायला सांगितलं. आम्ही जीवनविद्येच्या अभ्यासात अशा प्रकारचा विचार करायला शिकलो. आता टेक्निक्सबद्दल सांगायचं झालं तर पहिलं म्हणजे सतत सत्कर्म करणं - कर्म हे विचार, उच्चार, आचार, कल्पना आणि भावना या सर्व पातळीवर होत असतं.

मनात येणारा प्रत्येक विचार हा शुभविचार असला पाहिजे. त्यासाठी आम्ही जीवनविद्येत शिकवतात तो सोपा exercise केला. शुभचिंतन किंवा Super positive affirmations म्हणणं. त्यातला महत्वाचा शब्द आहे 'सर्वांना'! सर्वांचं भलं, सर्वांचं कल्याण, सर्वांना आनंद, सर्वांना ऐश्वर्य हा या शुभचिंतनाचा पाया आहे. हे शुभविचार आम्ही सर्वजण सतत करत होतो. या सतत केलेल्या चांगल्या व्यापक विचारांमुळे आमचं बोलणं, वागणं, कल्पना आणि भावना त्याच प्रकारच्या होत्या. या सगळ्यामुळे एक सकारात्मक ऊर्जा (positive energy) तयार होते. ती तुम्हाला तुमचे प्रयत्न करायला उभारी देते.

दुसरं टेक्निक असं, की मनाने दुसऱ्याशी संवाद साधणे म्हणजेच internal communication. बारा/तेरा वर्षाची मुलं इतरांच्या प्रभावाने म्हणा किंवा मोठी होत असतात म्हणून काहीवेळा हट्टीपणा करतात. अशावेळी त्यांच्याशी आतून संवाद साधणं महत्वाचं ठरतं. त्यांना तुम्ही मनातल्या मनात म्हणू शकता की - तू खूप भाग्यवान आहेस, पुण्यवान आहेस, तू यशवंत आहेस, तू मनापासून अभ्यास करतोस किंवा करतेस. जर हे सगळं सांगणं, तुमची मुलं झोपलेली असतांना तुम्ही केलं, तर ते त्यांच्यापर्यंत पटकन पोचतं. कारण झोपलेले असताना त्यांचं मन जास्त पटकन प्रतिसाद देतं आणि त्यांचं वागणं जास्त सकारात्मक होत जातं. मी (गार्गी सुखटणकर) वापरत असलेल्या या internal communicationमुळे आमचं external communication म्हणजे प्रत्यक्ष संवादही खूप चांगला होत होता. सोहमचं त्याच्या ध्येयावरून लक्ष विचलित न होणं यासाठीही या internal communicationची आम्हाला खूपच मदत झाली.

तिसरं टेक्निक म्हणजे visualization - डोळ्यासमोर चित्र आणणे. जीवनविद्येच्या अभ्यासाचे आमचे मार्गदर्शक **श्री. प्रल्हाद वामनराव पै** यांनी आम्हाला लिहून दिलं होतं - स्क्रिप्स नॅशनल स्पेलिंग बी चा २०१९ चा विजेता सोहम सुखटणकर. हा कागद सोहमच्या खोलीत होता. तो कागद सोहम रोज पाहत होता. मी तो रोज पाहत होते. सोहमचे वडील तो कागद रोज पाहत होते. दोन्ही आज्यांच्याकडे हा लिहिलेला कागद होता. त्यासुध्दा तो रोज पहात होत्या.

याबरोबर चौथं टेक्निक म्हणजे कृतज्ञता. जीवनविद्या या महत्त्वाच्या जीवनमूल्याबद्दल असं सांगते, की तुम्हाला आत्तापर्यंत जे जे मिळालं आहे त्याबद्दल तुम्ही कृतज्ञता बाळगा. आम्ही सर्वजण रोज एकत्र बसून शुभचिंतन (super positive affirmations) आणि त्यानंतर कृतज्ञतेची साधना करत होतो. साधना हा शब्द खूप मोठा वाटतो. पण याचा अर्थ असा, की आम्ही ते नियमितपणे करत होतो. हा आमचा दिनक्रम होता. आम्हाला असं वाटतं, की आपल्या आयुष्यात ज्या ज्या चांगल्या गोष्टी आहेत त्याबद्दल आपण कृतज्ञ असलो तर, काय नाही

पेक्षा काय आहे, यावर तुमचं लक्ष राहतं. दिवसातून एकदा एकत्र बसून कृतज्ञता व्यक्त करणं हा आमच्या दिनक्रमाचा महत्वाचा भाग होता. आम्हाला प्रत्येकाला हे सांगावंसं वाटतं, की प्रत्येकाने हे करून पाहावं. दिवसभरात असे खूप प्रसंग किंवा क्षण असतात, जेव्हा आपल्याला वाटतं की आपल्याकडे किती भरभरून आहे. त्यावेळी आपल्याला, आपल्याकडे असलेल्या गोष्टींबद्दल, कृतज्ञता वाटली पाहिजे. असं रोजच्या रोज केलं तरच तो तुमच्या सवयीचा भाग होतो.

स्पर्धेला जायच्या आधी आम्ही सोहमला सांगितलं होतं, की तू आत्तापर्यंत खूप स्पर्धा जिंकल्या आहेस, बक्षिसं मिळवली आहेस. तुला जे मिळालं आहे त्याबद्दल तू कृतज्ञ राहा. नॅशनल स्पेलिंग बी जिंकण्यावर लक्ष केंद्रित करण्यापेक्षा त्या स्पर्धेत भाग घेण्याचा आनंद घेण्यावर लक्ष केंद्रित कर.

प्रश्न: सोहम एकदा स्पर्धेत स्थानिक पातळीवरच बाद झाला होता असं मगाशी बोलण्यात आलं. जेव्हा असं झालं तेव्हा त्याला वाईट वाटलं कां? त्याला तुम्ही कसं समजावलं?

उत्तर: त्याला वाईट वाटलं आणि तो रडलासुध्दा. पुन्हा भाग घ्यायचा नाही असंदेखील म्हणाला. तेव्हा आम्ही तो विषय फार लांबवला नाही. थोड्या महिन्यांनी पुन्हा त्याला पुस्तकं दाखवून विचारलं, की तुला खरंच अजिबात भाग घ्यायचा नाही की पुन्हा प्रयत्न करायचे आहेत? आम्ही विचारेपर्यंत मध्ये जरा वेळ गेला होता आणि मुळात सोहमला स्पेलिंग बी मध्ये भाग घ्यायला आवडत होतं. म्हणून तो तयार झाला. मग आम्ही त्याच्याशी बोललो. त्याला आधी अपयश मिळालेल्या लोकांची उदाहरणं दिली आणि सांगितलं, की अपयश आलं म्हणून त्यांनी प्रयत्न सोडून दिले नाहीत. आज ही लोकं यशस्वी झालेली आहेत. तसंच त्याने स्वतःची कोणती टेक्निक्स सुधारायला हवी आहेत हे आम्ही शोधलं आणि त्यावर काम केलं. त्याचबरोबर सोहमला काही सांगताना आई-वडील म्हणून आमचं सतत एकमत होतं. मुलांच्यासाठी ही खूप महत्वाची गोष्ट आहे.

प्रश्न: या स्पर्धेत पुन्हा भाग घ्यायचा हे सोहमने स्वतःहून ठरवलं होतं हे तुम्ही आत्ताच सांगितलं. पण असं कधी झालं कां, की तो प्रयत्न करताना थकला आणि तुम्हाला पालक म्हणून त्याला प्रोत्साहन द्यायची वेळ आली?

उत्तर: थकला असं नाही म्हणता येणार, पण त्याच्या मनात शंका यायच्या की काय होईल. तेव्हा आम्ही त्याला सांगितलं - तू पूर्वीपेक्षा जास्त प्रयत्न करतो आहेसच. पण तू जो अभ्यास करतो आहेस त्यामुळे तुला नवीन नवीन शब्द कळत आहेत. तुझं शब्दज्ञान आणि शब्दसंग्रह (vocabulary) वाढतो आहे. तू इतकावेळ मन एकाग्र करून अभ्यास करतोस तेव्हा तुझा स्टॅमिना वाढतो आहे. आपल्या ध्येयाचा पाठपुरावा करण्यासाठी लागणारी चिकाटी तुला मिळते आहे. तू या स्पर्धेच्या वेगवेगळ्या टप्प्यावर यशस्वी होतो आहेस. तू या वेगवेगळ्या टप्प्यातील स्पर्धांच्यावेळी ताणाखाली असतानासुध्दा मन एकाग्र ठेवू शकतो आहेस. ही सगळी महत्वाची जीवनकौशल्य (life skills) आहेत. ती तूला नॅशनल स्पेलिंग बी स्पर्धेची तयारी करण्याच्या निमित्ताने शिकायला मिळत आहेत.

कितवा रँक येईल किंवा मी जिंकेन की नाही यावर लक्ष ठेवून प्रयत्न करू नकोस. तू मन लावून प्रयत्न कर. तुझ्या प्रयत्नांना यश मिळेल. जेवढे जास्त प्रयत्न करशील तेवढं जास्त यश मिळेल. तू स्पर्धा जिंकूसुध्दा शकतोस याची खात्री बाळग.

आम्ही सोहमला या स्पर्धेत भाग घेतल्यावर, या स्पर्धेसाठी लागणारा अभ्यास कसा करायचा याचं वेगळं प्रशिक्षण दिलं. ते देण्यासाठी एक तरबेज शिक्षिका होती. इतरही साधनं त्याला अभ्यासासाठी उपलब्ध करून दिली. पूर्वी तयारी करताना ज्या त्रुटी राहिल्या होत्या त्या यावेळी आम्ही भरून काढण्यासाठी सर्व परीने प्रयत्न केले.

आम्ही सोहमला सांगितलं होतं, की- आता तुला अभ्यासासाठी सर्व गोष्टी उपलब्ध आहेत. त्याबद्दल तू कृतज्ञ रहा. त्या गोष्टींचा वापर करून तुझी यावर्षी पूर्वीपेक्षा चांगली प्रगती होते आहे. त्यामुळे तू आत्मविश्वासाने प्रयत्न चालू ठेव.

जेव्हा काही कारणामुळे तुमचं मन अस्थिर व्हायला लागतं तेव्हा ते स्थिर करण्यासाठी तुम्हाला शुभचिंतन (super positive affirmations) करण्याची सवय खूप उपयोगी पडते. आम्ही सतत शुभचिंतन (super positive affirmations) करताना म्हणत होतो की - सर्वांचे उत्तम प्रयत्न होऊ देत, सर्वांना शब्दकोषावर (dictionary) प्रभुत्व (mastery) मिळवता येऊ दे. सर्वांना यश मिळू दे.

प्रश्न : कोणत्याही स्पर्धेत भाग घेताना तुम्ही इर्षेने गेलात तर सगळी मानसिक शक्ती वापरून तुम्ही जिंकू शकता असा एक सर्वसाधारण समज आहे. जेव्हा पत्रकारांनी सोहमला विचारलं की शेवटचे आठ स्पर्धक राहिल्यावर तुझ्या मनात काय विचार होते. यावर सोहमचे उत्तर होतं, इथे पोहोचेपर्यंत किती प्रयत्न करण्याची गरज आहे ते मला माहिती आहे. आठही जणांनी खूप कष्ट घेतले असल्याने आठहीजण जिंकावे असं मला वाटत होतं.

प्रश्न: सोहमने असा विचार करण्यामागे पालक म्हणून नक्कीच तुमचा मोठा वाटा आहे. तुम्ही त्याला कसं घडवलंत ?

उत्तर: जीवनविद्या तत्वज्ञान मुलांना शिकवण्यासाठी जे संस्कारवर्ग चालवले जातात त्यात सोहमने लहानपणापासून भाग घेतला आहे. त्यात शिकवतात, की तुम्ही एकटे सुखी होऊ शकत नाही. सर्वांच्या सुखात तुमचं सुख आहे. ही शिकवण त्याच्या मनाने घट्ट पकडली आहे. त्यामुळे त्याच्या बरोबरच्या स्पर्धकांपैकी कोणी स्पर्धेतून बाद झालं तर आपण हरल्यासारखं त्याला वाईट वाटायचं, इतका तो त्यांच्याशी जोडला गेला होता. याचं श्रेय मी संपूर्णपणे सत्गुरू श्री वामनराव पै यांच्या जीवनविद्या या तत्वज्ञानाला देते. जीवनविद्येमुळे आज सोहमला हा विचार मिळाला आहे. आज एका ऐवजी आठ मुलं जिंकली आहेत. त्यामुळे आठ कुटुंबं आनंदात आहेत. हे अशक्य वाटू शकतं पण जर तुम्ही खूप तीव्रतेने याबाबत मनात विचार धरल्यास ते शक्य होऊ शकतं. सोहम वयाच्या तिसऱ्या वर्षापासून संस्कारवर्गात जातोय. त्यात दुसऱ्यांच्या भल्यात आपलं भलं आहे, असं शिकवलं जातं, ते सोहमच्या मनात रुजलं आहे. कदाचित

म्हणून त्या पत्रकारापुढे सोहमने असं मत व्यक्त केलं असावं.

प्रश्न: स्पर्धेच्या वेळी स्पर्धक स्टेजवर असताना त्यांच्याबद्दल माहिती सांगणारी एक छोटी चित्रफीत (video clip) दाखवली जात होती. ते स्टेजवर आले की त्यांचे फोटो काढले जात होते. समोर प्रचंड संख्येने बसलेले प्रेक्षक हे स्पर्धक काय बोलत आहेत याकडे कान लावून बसलेले होते. या सगळ्या गोष्टींचा मनावर ताण येऊ शकतो किंवा लक्ष विचलित होऊ शकतं. पण सोहम या स्पर्धेच्या दरम्यान खूप शांत आणि स्थिर होता असं खूप ठिकाणी लिहून आलं आहे. यामागे काय कारण आहे?

उत्तर: मगाशी सांगितलं की स्पर्धेची तयारी करत असताना सोहम महत्वाची जीवनकौशल्य (life skills) शिकला. आम्ही त्याला सांगितलं होतं की तू प्रयत्नांवर लक्ष ठेव, तुला शक्य होतील ते सगळे प्रयत्न मनापासून केले आहेस. असं जेव्हा असतं तेव्हा तुमच्या मनाला एका गोष्टीची पूर्ण खात्री असते की माझ्याकडून कोणतीही कमतरता राहू दिलेली नाही. तू जिंकशील की नाही याचा विचार करण्यापेक्षा, तयारी करताना तू जे शिकला आहेस ते ज्ञान आहे आणि ते कायम तुझ्याजवळ राहणार आहे, हे लक्षात ठेव. हे सगळं सांगणं त्याला शांत राहण्यासाठी उपयोगी पडलं. पण त्याच बरोबर सोहम आणखी एक करत होता. तो स्पर्धेच्यावेळी रिकाम्यावेळात सतत शुभचिंतन (super positive affirmations) करत होता. त्याचं नाव उच्चारलं, की माईक पर्यंत जाताना तो शुभचिंतन करत जायचा. आपल्या शब्दाचं स्पेलिंग सांगून झालं, की आपल्या जागेवर परत येताना शुभचिंतन करत यायचा. **या शुभचिंतनाचा फायदा त्याला असा झाला, की तो फक्त त्या क्षणाचा विचार (Being in the moment) करू शकला.** त्या क्षणाला फक्त शब्द आणि त्या शब्दाचं स्पेलिंग या व्यतिरिक्त दुसऱ्या सर्व गोष्टीकडे त्याने संपूर्ण दुर्लक्ष केलं. जेव्हा तुम्हाला शब्द दिला जातो तेव्हा तो शब्द समजणं आणि स्पेलिंग सांगताना त्याच्यामध्ये कोणतीही चूक न करता सांगणं यासाठी फक्त त्या क्षणाचा विचार करणं या टेक्निकचा खूप उपयोग झाला. हे टेक्निक जीवनविद्येच्या सतत शुभचिंतनाच्या अभ्यासामुळे आम्हाला शिकायला मिळालं. आमच्या कुटुंबातील सर्वजण प्रयत्नपूर्वक सतत शुभचिंतन करत असतात.

समारोप:

सुखटणकर कुटुंबातील सर्वजण स्वानुभवातून व जीवनविद्येच्या ज्ञानातून यशाचा खात्रीपूर्वक फॉर्म्युला (सूत्र) खालील प्रमाणे सांगतात -

१. प्रयत्नांची पराकाष्ठा

२. शुभचिंतनाची पराकाष्ठा

३. आपल्याजवळ जे आहे आणि ज्यांच्यामुळे आहे त्या सर्वांबद्दल मन:पूर्वक कृतज्ञता

जीवनविद्येचे श्री प्रल्हाद पै यांचे वेबिनार, टेलीकॉन्फरन्सेस आणि वैयक्तिक मार्गदर्शन याबाबत सुखटणकर कुटुंब त्यांचे सदैव ऋणी आहे. (अमेरिकेतील जीवनविद्या केंद्राविषयी अधिक माहितीसाठी संपर्क: geeta@jeevanvidya.us)

***

'मिस इलिनॉय फॉर अमेरिका' २०१९ - मुगुटाची मानकरी - मोनिका पाटणकर

- विनता कुलकर्णी (शिकागो)

३१ मे २०१९ रोजी एल्जिन (इलिनॉय) येथील द हिमेन्स कल्चरल सेंटर येथे आयोजित समारंभात मिस इलिनॉय फॉर अमेरिका हा मुगुट ग्रेटर शिकागो परिसरातील मराठी युवती **मोनिका पाटणकर** हिने मिळवला आणि मराठी नावाची अजून एका क्षेत्रात नोंद झाली. मिस इलिनॉय स्पर्धा जिंकणारी मोनिका इलिनॉयमधेच उच्चशिक्षित मध्यमवर्गीय मराठी कुटुंबात जन्मली, ग्रेटर शिकागो परिसरात- नेपरव्हिल उपनगरात लहानाची मोठी झाली, आणि सध्या ती कायदेविषयक क्षेत्रात व्यवसाय करते आहे. तिच्या आईवडिलांनी त्यांच्या स्वत:च्या आयुष्यामध्ये, करीअर घडवण्यांत खूप मेहनत घेतली असून त्यांच्या कुटुंबात पीएच.डी. शिक्षण पूर्ण करणारे ते पहिलेच आहेत असे मोनिका सांगते. तिचे वडील डॉ. पद्माकर पाटणकर 'मॅनेजमेंट सायन्स'मधे मास्टर्स आणि 'अप्लाईड मॅथेमॅटिक्स'मधे (टेक्सस विद्यापीठ, डॅलस येथून) पीएचडी. आहेत. तिची आई डॉ. नयना पाटणकर यांनी पुणे विद्यापीठातून जिनेटिक्स क्षेत्रात पीएचडी. केले असून, या विषयाच्या क्षेत्रात पीएचडी करणाऱ्या त्या पुणे विद्यापीठातील पहिल्या विद्यार्थिनी आहेत. लग्नानंतर पाटणकर दांपत्य ग्रेटर शिकागो परिसरातील नेपरव्हिल उपनगरात स्थलांतरित झाले. ते दोघेही तांत्रिक क्षेत्रात अनेक वर्षे काम करत होते. सध्या पद्माकर पाटणकर अरोरा (इलिनॉय)मधील इलिनॉय मॅथ अँड सायन्स अॅकडमीमधे प्रशिक्षक आणि नयना पाटणकर आपल्या मुलीच्या- मोनिकाच्या लॉ फर्ममधे मॅनेजर आहेत.

मोनिका आणि तिचा भाऊ अमेय दोघेही कायदे-पंडित, व्यवसायाने वकील! या दोघांची भागीदारीत अरोरा (इलिनॉय) येथे लॉ फर्म (Piccony & Patankar, P.C) आहे. अमेरिकेत जन्मलेली

ही भावंडे मराठीपणही टिकवून आहेत, मोनिका महाराष्ट्र मंडळ शिकागोच्या उपक्रमांमधे लहानपणापासून आणि आताही सहभागी असते. याचे श्रेय तिच्या आईवडिलांना आणि त्यांनी तिच्यावर केलेल्या संस्कारांनाही द्यायला हवे. पद्माकर पाटणकर यांनी पूर्वी महाराष्ट्र मंडळ शिकागोच्या कार्यकारिणीवर उपाध्यक्षपद भूषविले आहे. नयना पाटणकर पूर्वी शिकागो मंडळाच्या कार्यकारिणीवर सदस्य होत्या. गेल्या वर्षी मोनिकानेही शिकागो मंडळात युवाविभागाच्या समितीचे प्रतिनिधित्व केले. तसेच मंडळाच्या नवरात्रोत्सवात रास-गरबा कार्यक्रमाच्या (मास्टर ऑफ सेरेमनी/)

सूत्रसंचालनाची जबाबदारी सांभाळली. आणि यंदा २०१९मधे ती मंडळाच्या कार्यकारिणीवर सदस्य असून शिकागो मंडळाच्या कार्यक्रमांच्या आयोजनात, सहभागी असते. ती मंडळाची कायदेविषयक सल्लागारही आहे.

मोनिका मराठी कुटुंबीयांशी, आणि मराठीभाषक मित्रमैत्रिणींशी मराठीत व्यवस्थित बोलते. तिला मराठी चित्रपट बघायला आवडतात. "अलिकडेच मुंबईत गेले असताना, कोळीनृत्याचा उगम आणि त्यामागची परंपरा याविषयी छान माहिती मिळाली, यातून आपल्या संस्कृतीशी माझे नाते दृढ होण्यास मदत होतेय", असेही ती सांगते. लावणी, कोळीनृत्य आणि भारतीय परंपरेतील विविध नृत्यांची तिला आवड असून त्यात तिचा सहभाग असतो.

मिस इलिनॉय स्पर्धेत भाग घेण्याचा विचार तुझा स्वत:चा की अजून कुणामुळे? या प्रश्नाला उत्तर देताना मोनिका सांगते- 'हा विचार आणि निर्णय संपूर्णपणे माझाच. राष्ट्रीय पातळीवर मिस अमेरिका स्पर्धेसाठी इलिनॉय राज्याचे प्रतिनिधित्व करावे अशी माझी मनापासून इच्छा होती. आणि त्यादृष्टीने मी तयारी करू लागले. घरच्यांचा, आणि सर्व नातेवाईकांचा यांस पाठिंबा आणि प्रोत्साहन मिळाले. त्यात मानसिक तयारीचाही खूप मोठा भाग असतो. शेकडो प्रेक्षक/श्रोत्यांसमोर व्यासपीठावर उभे राहण्यासाठी खूपच मनोधैर्य आणि हजरजबाबी असावे लागते. या स्पर्धेसाठी तयारी करताना मानसिक दडपण न येऊ देता सर्व प्रक्रियेत मला आनंदाने सहभागी व्हायचे होते.

सौंदर्य स्पर्धा (ब्युटी पॅजंट) म्हंटले, की त्याबद्दल, बरेचदा एक झगमगाटी क्षेत्र आणि काही विशिष्ट मते समाजात बनलेली असतात. तेव्हा मिस इलिनॉय स्पर्धा कशासाठी आणि कशाप्रकारे घेतली जाते, त्याविषयी थोडक्यात:

'मिस इलिनॉय प्रोग्राम'चा उद्देश आहे संस्कृती, राजकारण आणि सामाजिक क्षेत्रात युवतींच्या मताला प्रोत्साहन देणे. या स्पर्धेतून १७-२५ वयोगटातील आजच्या तरुण महिलांना वर्षभरात प्रसार-माध्यमांमध्ये आणि मोठ्या प्रमाणावर लोकांपुढे त्यांचे दृष्टिकोन, कौशल्य आणि कर्तबगारी व्यक्त करण्यासाठी एक व्यासपीठ मिळते. मिस इलिनॉयसाठी आजवरच्या बहुतेक स्पर्धक युवती महाविद्यालयाच्या पदवी/पदव्युत्तर शिक्षण झालेल्या किंवा लवकरच असे शिक्षण पूर्ण करणाऱ्या, किंवा पदवीधर व पूर्ण वेळ नोकरी/व्यवसाय करणाऱ्याही आहेत. काहींना यांतून पुढील उच्च शिक्षणासाठी मिस अमेरिका शिष्यवृत्ती अनुदानाची मदत झाली आहे. अशा स्पर्धेत भाग घेण्यासाठी त्या त्या राज्याचे रहिवासी असणे हीदेखील एक अट आहे. मिस इलिनॉय विजेत्यांची पुढच्या टप्प्यावर स्पर्धा घेतली जाऊन राज्याचे प्रतिनिधित्व करणारी 'मिस इलिनॉय यू एस ए' ची निवड केली जाते. निवड झालेली युवती राष्ट्रीय पातळीवर 'मिस यू एस ए' स्पर्धेत सहभागी होण्यास पात्र ठरते. यंदा स्पर्धेत सहभागासाठी अर्जासोबत स्वत:ची माहिती, सामाजिक उपक्रमात पुढाकार घेणारे एक विधान, स्पर्धक- करार आणि चिल्ड्रेन्स मिरॅकल नेटवर्कसाठी डोनेशन स्वरूपात (https://www.missamericaforkids.org/) $100 रक्कम गोळा करणे आवश्यक होते.

नियंत्रित आहार, नियमित व्यायाम, 'मेकप ट्युटोरियल', 'ड्रेस अप ट्युटोरियल' अंगभूत कलेचे सादरीकरण, आणि यासर्व सरावासाठी आठवड्याचे १२-१५ तास वेळ खर्च करणें हे सगळे तयारीचा भाग असले तरी केवळ बाह्यदर्शनी कसे दिसता एव्हढेच या स्पर्धेसाठी पुरेसे नाही. सर्वांगीण व्यक्तिमत्व अजमावण्यासाठी स्पर्धकाची पत्रकार परिषदेसारखी, ५-७ परीक्षकांच्या समोर १० मिनिटांची स्वतंत्रपणे मुलाखत घेतली जाते. त्यात स्वत:ची ओळख करून देणे, शैक्षणिक आणि व्यावसायिक उद्दिष्टे, चालू घडामोडींविषयी आणि सामाजिक समस्यांवरील मते, स्वत:चे छंद आणि इतर उपक्रमांबद्दल प्रश्न विचारले जातात. त्यानंतर स्पर्धकाला तिने अर्जात नमूद केलेल्या अंगभूत कलेची/प्रतिभेची 'झलक' ९० सेकंदांमधे सादर करावयाची असते. यात नृत्य, गायन, वादन, संगीत, नाट्य, जिम्नॅस्टिक, 'व्हेंट्रीलॉक्विझम', 'बॅटन-ट्वर्लिंग' इत्यादी समाविष्ट आहेत. यासर्वांतून कला, कार्यक्षमता वक्तृत्व, देहबोली, तांत्रिक कौशल्य, घटनेचे नियंत्रण, सभाधीटपणा, पोशाख, साथ-संगीत, कोरियोग्राफीचा वापर आणि एकंदरित सादरीकरण किती प्रभावी, मनोरंजक आणि उल्लेखनीय आहे याचाही विचार केला जातो.

स्पर्धेचा पुढचा टप्पा म्हणजे सामाजिक प्रभाव/ संध्याकाळच्या औपचारिक समारंभासाठी पोशाख: आपापल्या निवडीनुसार स्पर्धकाने औपचारिक पोशाखात व्यासपीठावर पदार्पण करणे आणि निवडलेल्या सामाजिक विषयावर सुमारे ८-१० सेकंदात एक प्रभावी विधान सादर करणे!

त्यानंतर प्रत्येक स्पर्धकास हजारो श्रोत्यांच्या उपस्थितीत, व्यासपीठावर एक प्रश्न आणि त्यातून निर्माण होणारा एक प्रतिप्रश्न अशी परस्परसंवादी आणि अत्यंत उत्साही पध्दतीने मुलाखत घेतली जाते. उमेदवाराची बुध्दिमत्ता, व्यक्तिमत्व, करिष्मा, सार्वजनिक मंचावर संभाषण-कौशल्य, हजरजबाबीपणा व उमेदवार समकालीन पिढीची आदर्श प्रतिनिधी (Role Model) बनण्यांस योग्य आहे का, याचे मूल्यमापन केले जाते.

अर्थात या सर्व प्रक्रियेत मोनिका पाटणकरसमोर अनेक आव्हाने आली असणारच. महत्त्वाचे हे, की यशस्वी होण्यासाठी तिने संतुलित पध्दतीने सर्व आव्हाने हाताळली. इलिनॉय राज्य पातळीवर आणि आता अमेरिका- देश पातळीवर स्पर्धेसाठी तयारी करताना एकीकडे स्वत:च्या लॉ फर्ममधे मोनिका काम करत आहे, शिकागो महाराष्ट्र मंडळाच्या उपक्रमांमधे समिती-सदस्य म्हणून तिचा सहभाग आहे आणि नृत्य सादरीकरणाच्या कार्यक्रमांसाठी तिचा सराव चालू आहे. तेव्हा या सर्व गोष्टींसाठी तिच्या मते काटेकोर वेळेचे नियोजन आणि त्याचे पालन हाच तिच्या यशाचा मंत्र आहे.

२०१९चा मिस इलिनॉय हा बहुमान मिळाल्याबद्दल मोनिका अतिशय आनंदी आहे, आणि वर्षभरातील प्रत्येक क्षण मिस इलिनॉय पदाकडून अपेक्षित कार्य आणि उपक्रम राबविण्यांस ती सज्ज आहे. नुकतीच, मिस इलिनॉय पॅजंट झाल्यावरचे आपले काही अनुभव मोनिका सांगते-

"३१मे २०१९ रोजी झालेल्या पॅजंट स्पर्धेमधे विजेती म्हणून माझे नाव घोषित केलेले मी ऐकले, तो अत्यानंदाचा क्षण, त्यानंतर मिस इलिनॉय मुगुटासह माझा केला गेलेला सत्कार-सोहोळा आणि माझ्या मनाची अवस्था मी विसरू शकणार नाही. दिवसभराच्या धावपळीनंतर, जल्लोषानंतर मी साधारण मध्यरात्री घरी पोहोचले. परंतु लगेच दुसऱ्याच दिवशी सकाळी आठ वाजता अमेरिकेतील मिस इलिनॉय म्हणून प्रथमच आमंत्रित मी- इलिनॉयमधील 'ला ग्रँज' उपनगरात पेट (Pet) परेडमध्ये हजर होते. या मिरवणुकीत एका 'कन्वर्टिबल कार'मध्ये बसून मी त्यादिवशी सुमारे १०,००० लोकांना हात हलवून अभिवादन केले." मिस इलिनॉय पद मिळून महिनाही झाला नाही, पण तेव्हापासून दररोज अनेक कार्यक्रमांची तिला आमंत्रणे येत आहेत. अनेक उपक्रमात सहभागी होते आहे. उदा. इलिनॉय मधील निराधार गरीब गरजूंना अन्न पुरवणाऱ्या मरी विल्किन्सन फूड पॅन्ट्री आणि अरोरा इंटरफेथ फूड पॅन्ट्रीच्या वतीने 'Fill a Cart Radiothon' फंड-रेजिंगमधे भाग, मार्लेज मिनिस्ट्रीतर्फे नेपरव्हिल इलिनॉयमधील हॉस्पिटलमधे 'न्यू बॉर्न इन्टेसिव केअर युनिट'ला काही उपयुक्त वस्तू प्रदान केल्या. अनेक नवीन संस्थांना ती भेट देतेय, नवीन संस्थांशी जोडली जात आहे, आणि मिस इलिनॉयच्या मंचावरून विविध सामाजिक क्षेत्रांत जागरुकता वाढवण्याचा प्रयत्न करते आहे.

मोनिका पाटणकरच्या आजवरच्या वाटचालीत तिचे कुटुंब, नातेवाईक आणि मित्रमैत्रिणी या सर्वांचाच प्रभाव आहे आणि त्यांचे सतत प्रोत्साहन मिळते असे ती सांगते. तिचे आजोबा एक व्यावसायिक अभिनेता होते. त्यांची महाराष्ट्रात स्वत:च्या मालकीची थिएटर कंपनी होती. तिचे काका- प्रभाकर पाटणकर हे व्यावसायिक अभिनेते होते. "२२ जून १८९७" या मराठी चित्रपटात व "अर्धसत्य'" या हिंदी चित्रपटात त्यांनी भूमिका केली. आणि अकादमी पुरस्कार प्राप्त 'गांधी' चित्रपटांत पडद्यामागील आवाज - ऊर्फ बोलण्याची भूमिका बजावली. तिचे मामा आणि त्यांचे कुटुंब उद्योजक आहेत. 'या सर्वांकडून, कला, अभिनय, उद्योजकता हे गुण शिकायला मिळाले. जरी मी अमेरिकेत जन्मले आणि वाढले तरीही महाराष्ट्र मंडळ शिकागोच्या कार्यकारिणीवर व कार्यक्रमात सहभागी होऊन मला माझा मराठी वारसा शिकण्याची संधी मिळाली, मराठी नृत्य नाट्य अभिनयाची गोडी लागली. त्याबद्दल मी सदैव ऋणी आहे' असंही ती सांगते.

ऑगस्ट २०१९मध्ये लास वेगस (नेवाडा) येथे होणाऱ्या राष्ट्रीय पातळीवरील पॅजंट स्पर्धेसाठी सध्या मोनिका तयारी करते आहे. या स्पर्धेत मिस इलिनॉय म्हणून ती इलिनॉय राज्याचे प्रतिनिधित्व करणार आहे. या राष्ट्रीय स्पर्धेनंतरही तिचा 'पॅजंट-टायटल'नुसार विविध संस्थांमधे वावर राहणार आहेच. आपली लॉ फर्म अजून मोठी करणें, कायदेविषयक 'क्लाएंट्स्'ना सर्वतोपरी योग्य ती मदत करणे, मराठी संस्कृतीचा अमेरिकेत प्रचार, महाराष्ट्र मंडळ शिकागोच्या कार्यक्रमांना मदत हेदेखील तिच्या कामाच्या यादीत अग्रक्रमांमधे आहे. "तुमचा आवडीचा कोणताही छंद, कार्य असो, प्रत्येक बालकाने आपल्या स्वप्नांचा पाठपुरावा करण्यास सक्षम असावे", असा संदेश तिला पसरावयाचा आहे.

"A determined woman does not find it hard to succeed, she finds it hard to stop trying." मोनिकाला तिच्या आगामी सर्व स्वप्नपूर्तीसाठी शुभेच्छा!

***

न्यू जर्सीच्या 'क्लब ५५'चा कार्यक्रम

न्यू जर्सीच्या 'क्लब ५५'चा २०१९ सालचा पहिला कार्यक्रम २ जून रोजी मराठी विश्व कम्युनिटी सेंटरच्या सभागृहात साजरा झाला. या प्रसंगी न्यू यार्क स्कूल ऑफ मेडिसिनमधील न्यूरॉलॉजी विषयाचे प्राध्यापक **डॉ. जयदीप** भट यांचे 'Dementia and Alzheimer Disease' या विषयावर भाषण व पॉवर पॉइंट प्रेझेंटेशन झाले.

मध्यंतरात सोनाली पेंडसे यांच्या 'शेझन फूड'ने पुरविलेल्या पाव-भाजी, दही-वडा आणि दुधी-हलव्याच्या उपहारानंतर पु. ल. देशपांडे यांच्या जन्मशताब्दीनिमित्त 'पुलकित नारी' हा डॉ. मीना नेरुरकर लिखित आणि दिग्दर्शित कार्यक्रम स्थानिक कलाकारांनी सादर केला. अंजली आगाशे यांनी निवेदिकेच्या रूपात कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. पु.लंच्या बटाट्याची चाळ, वाऱ्यावरची वरात, तुझे आहे तुजपाशी, ती फुलराणी, सुंदर मी होणार, अशा गाजलेल्या नाटकातल्या आणि इतर लेखनातल्या स्त्री-व्यक्तिरेखा कार्यक्रमात सादर केल्या. धनश्री केळकर, किनी प्रभाकर, सीमा शहाणे, प्रज्ञा पाटणकर, मीना नेरूरकर, सोनाली पोटे, माधुरी काळे, धनश्री वैद्य या सर्वच कलाकारांनी प्रत्येक व्यक्तिरेखा उत्तम उभी केली. सूत्रधार अंजली आगाशे यांचे कथन आणि रेश्मा धोपटे, अनघा येरंडे, स्नेहा जिंतुरकर यांच्या पडद्यामागील सहाय्याने कार्यक्रम संपन्न झाला.

***

बृहन्महाराष्ट्र वृत्त

॥ मराठी तितुका मेळवावा ॥

Subscription Remittance Address
BMM Newsletter
144 Hope Road,
Holland, PA 18966-5408